# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १६८ वा ❑ भारतीय सौर दिनांक २७ श्रावण शके १९४८, मंगळवार दि.१८ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## सापांबाबतच्या अंधश्रद्धा आणि वास्तव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

आजचे युग विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगातही समाजात अंधश्रद्धा ठासून भरलेली आहे. सापांबाबत समाजात अनेक अंधश्रद्धा आणि गैरसमज पसरलेले आहेत, ज्यांना विज्ञानात कोणताही आधार नाही. या अज्ञानामुळे दरवर्षी हजारो निरपराध सापांना मारले जाते आणि सर्पदंश झाल्यावर योग्य उपचार न मिळाल्याने लोकांचा जीव जातो.

सापांबद्दल समाजात अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. परंतु, विज्ञानाच्या आधारे पाहिल्यास या गोष्टी पूर्णपणे खोट्या ठरतात. साप हा निसर्गातील एक महत्त्वाचा आणि शांत जीव आहे.

साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे, असे आपण म्हणतो. साप उंदीर खातो आणि त्यामुळे होणारे धान्याचे मोठे नुकसान टळते. नागपंचमीला आपण त्याची पूजा करतो. काही बायका त्याच्या... नागपंची या सणाला आजही समाजातील लोक दूध पाजतात,सापाच्या डोक्यावर नागमणी असतो.साप बदला घेतो अशा अनेक मान्यता अज्ञानामुळे आजही समाजात रूढ आहेत.

साप दूध पित नसतो.

साप हा सरपटणारा (सरीसृप) प्राणी असून तो सस्तन प्राणी नाही. त्यामुळे सापाच्या शरीरात दूध पचवण्यासाठी आवश्यक असणारे एन्झाइम्स नसतात. गारुडी लोकांना कित्येक दिवस उपाशी आणि तहानलेले ठेवतात. तहान लागल्यामुळे साप दूध पितो, परंतु यामुळे त्याच्या फुफ्फुसात संसर्ग होऊन काही दिवसांतच त्याचा मृत्यू होतो. साप निसर्गात फक्त पाणी पितो.

अनेक वर्षे जुन्या झालेल्या नाग सापाच्या डोक्यावर चमकदार नागमणी तयार होतो, असा समज आहे. विज्ञानानुसार कोणत्याही सापाच्या शरीरात किंवा डोक्यावर कोणताही मणी किंवा हिरा नसतो. हा निव्वळ चित्रपट आणि काल्पनिक कथांमधून पसरलेला गैरसमज आहे. काही भोंदू लोक दगडांना चमकणारा रंग लावून लोकांना फसवतात.

एखाद्या सापाला मारले किंवा दुखावले, तर तो माणसाचा चेहरा आपल्या डोळ्यात साठवून ठेवतो आणि नंतर त्याचा बदला घेतो.वास्तव काय आहे तर,सापाचा मेंदू अतिशय लहान आणि प्राथमिक स्वरूपाचा असतो. त्यांच्यात माणसाचा चेहरा लक्षात ठेवण्याची किंवा सूड घेण्याची बौद्धिक क्षमता नसते. जेव्हा एका सापाला मारले जाते, तेव्हा त्याच्या शरीरातून काही फेरोमोन्स (गंध) हवेत पसरतात. या गंधामुळे आकर्षित होऊन दुसरा साप तिथे येऊ शकतो, पण तो बदला घेण्यासाठी आलेला नसतो.

गारुड्याने पुंगी वाजवली की साप त्या सुरावर डोलू लागतो,ही देखील एक अंधश्रद्धा समाजात रूढ आहे.सापांना बाह्य कान नसतात, त्यामुळे त्यांना हवेतून येणारा पुंगीचा आवाज ऐकू येत नाही. गारुडी जेव्हा पुंगी हलवतो, तेव्हा साप स्वतःच्या संरक्षणासाठी त्या पुंगीच्या हालचालीवर लक्ष ठेवतो आणि आपली मान डोलवतो. तो आवाजावर नाही तर पुंगीच्या हालचालीवर प्रतिक्रिया देत असतो. सापाने धनलाभ होतो का? दोन तोंडे असलेला मांडूळ साप घरात ठेवल्याने किंवा त्याचा बळी दिल्याने गुप्त धन मिळते आणि माणूस श्रीमंत होतो.पण मांडूळ सापाचे शेपूट जाड आणि तोंडासारखे गोल असते, ज्यामुळे लोकांना त्याला दोन तोंडे आहेत असे वाटते. हा अत्यंत संथ आणि निरुपद्रवी साप आहे. या अंधश्रद्धेमुळे या सापांची मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जाते, जी कायद्याने गुन्हा आहे.

भारतामध्ये आढळणाऱ्या एकूण सापांपैकी केवळ काहीच साप (उदा. नाग, मण्यार, घोणस, फुरसे) विषारी आहेत. बहुतांश साप बिनविषारी असतात. बिनविषारी साप चावल्यास मांत्रिकाच्या उपायाने माणूस वाचतो आणि लोकांना वाटते की मंत्राने विष उतरले. मात्र, विषारी साप चावल्यास मांत्रिकाकडे वेळ वाया घालवल्याने माणसाचा मृत्यू होतो. प्रति-सर्पविष हाच सर्पदंशावरील एकमेव वैज्ञानिक आणि खात्रीशीर उपाय आहे, जो फक्त सरकारी रुग्णालयात मिळतो.

साप हा शेतकऱ्यांचा मित्र असून तो उंदरांचा नायनाट करून अन्नसाखळी संतुलित ठेवतो. सापांविषयीच्या अंधश्रद्धा दूर करून विज्ञानाची कास धरणे ही काळाची गरज आहे.साप शेतातील पिकांचे नुकसान करणारे उंदीर आणि घूस खाऊन नष्ट करतात.उंदरांचे प्रमाण नियंत्रित राहिल्याने पिकांचे आणि धान्याचे संरक्षण होते.साप नैसर्गिकरीत्या अन्नसाखळीचा समतोल राखण्याचे महत्त्वाचे काम करतात.

साप मानवाचा शत्रू नाही, तर स्वसंरक्षणासाठी तो दंश करतो. विनाकारण त्रास न दिल्यास तो मानवाला इजा करत नाही.काळाची गरजसापांविषयी समाजात पसरलेले गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे आवश्यक आहे.साप दिसल्यास मारून टाकण्याऐवजी सर्पमित्रांना बोलावून त्याला सुरक्षितपणे जंगलात सोडले पाहिजे.निसर्ग आणि सजीवांचे रक्षण करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

# केशव माधव विश्वस्त निधी तर्फे पद्मश्री डॉ.रामचंद्र गोडबोले व सौ.सुनीता गोडबोले दांपत्याचा सत्कार

### डॉ.गोडबोले दांपत्याचे वनवासी समाजाच्या कल्याणासाठी वैद्यकीय सेवा क्षेत्रातील कार्य म्हणजे समाज परिवर्तनाचे प्रेरणादायी नेतृत्व

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – वनवासी बांधवांच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित केलेल्या व भारत सरकारने २०२६ वर्षासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेल्या डॉ रामचंद्र गोडबोले व सौ सुनीता गोडबोले यांचा सत्कार समारंभ केशव माधव विश्वस्त निधी तर्फे कर्वेनगर येथील ''शैलेश'' सभागृहात संपन्न झाला.

छत्तीसगड मधील अतिदुर्गम भागात बस्तर येथे गेले पस्तीस वर्षापासून निस्वार्थी भावनेने वनवासी बांधवांच्या आरोग्यसेवेसाठी कार्य करणारे आयुर्वेदाचार्य डॉ रामचंद्र गोडबोले व सौ सुनिता गोडबोले यांना त्यांच्या अतुलनीय सेवेबद्दल भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले त्याप्रीत्यर्थ सत्कार आयोजित करण्यात आला.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर संघचालक उदयन पाठक यांचे हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन केशव माधव विश्वस्त निधीतर्फे गोडबोले दांपत्याचा सत्कार करण्यात आला.ह्या प्रसंगी केशव माधव विश्वस्त निधीचे अध्यक्ष रविंद्र जावळे, एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त), सचिव अरविंद देशपांडे यांची मुख्य उपस्थिती होती.

डॉ गोडबोले दांपत्याच्या सेवा यज्ञाच्या प्रेरणादायी प्रवास, वनवासी समाजातील अनुभव, आणि समाजकार्यासाठी त्यांची असलेली प्रेरणा व संघर्षाची गाथा ह्या प्रकट मुलाखतीतून स्पष्ट दिसून आली.नाट्यकलावंत प्रशांत कुलकर्णी यांनी मुलाखत घेतली.मुलाखतीनंतर उपस्थित नागरिकांनी त्यांना काही प्रश्न विचारले डॉ रामचंद्र गोडबोले व सौ सुनीता गोडबोले यांनी समर्पक उत्तरे दिली.

सत्काराला उत्तर देतांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेले आयुर्वेदाचार्य डॉ रामचंद्र गोडबोले म्हणाले, वनवासी बांधवांसाठी कार्य करण्याची प्रेरणा दामूअण्णा दाते, भास्करराव कळंबी, बाळासाहेब दिक्षीत यांचेकडून मिळाली. आदिवासी समाज खूप मेहनती आहे, प्रामाणिक आहे त्यांच्यामध्ये प्रचंड सहनशक्ती आहे तसेच त्यांच्यामध्ये साधेपणा, प्रामाणिकपणा आढळतो. ''कुपोषण मलेरिया, क्षयरोग व रक्तक्षयमुक्त बस्तर हे माझे स्वप्न आहे. वनवासी समाज बांधवांना मुख्य प्रवाहामध्ये आणणे तसेच त्यांना निरोगी ठेवणे व समाजामध्ये आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहू''

या वनवासी बांधवांसाठीच्या सामाजिक कार्यामध्ये समाजातील सर्वांनी प्रत्यक्ष मदत करावी असे आवाहनही डॉ रामचंद्र गोडबोले व सौ सुनीता गोडबोले यांनी या वेळी केले.

सौ सुनीता गोडबोले यांनी ''आदिवासी समाजबांधवांनी दुःखे समजवून घेण्यासाठी संवेदनशीलता असावी लागते तसेच त्यांची स्थानिक भाषा अवगत करावी लागते.वनवासी क्षेत्रातील कार्य करण्याची प्रेरणा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या रचनात्मक कार्यातून मिळाली. त्यांच्यासाठी आरोग्य शिबिरे आयोजित करून त्यांच्या आरोग्याकडे अधिकाधिक लक्ष देण्याचे काम गेले पस्तीस वर्षापासून करत आहोत.त्यामुळे बस्तर भागात अधिक कार्य करण्याची प्रेरणा आम्हाला मिळत आहे''असे यावेळी प्रतिपादन केले.

याच कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय बुद्धिबळपटू व नामांकित बुद्धिबळ प्रशिक्षक मकरंद वेलणकर यांनी बुद्धिबळ या विषयामध्ये बालाजी विद्यापीठाची पीएच. डी.मिळविल्याबद्दल केशव माधव विश्वस्त निधीच्या वतीने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला केशव माधव ह्या संस्थेमार्फत चालणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती संस्थेच्या विश्वस्त कविता शेंडे यांनी दिली.सूत्र संचालन नाट्यकलावंत प्रशांत कुलकर्णी यांनी केले.प्राची पाठक ह्यांनी संपूर्ण ''वंदे मातरम्'' गायिले.आभार विश्वस्त प्रकाश देशपांडे यांनी मानले.कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी, वैद्यकीय क्षेत्रातील मंडळी,''वनवासी कल्याण आश्रम''चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणीत शालेय साहित्याचे वाटप

ज्योतिर्मय साहित्य

वडवणी – देवदुत म्हणुन आपली ओळख निर्माण करणारे आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश मंगला सदाशिव शेटे यांचा वाढदिवस १५ ऑगस्ट रोजी सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा झाला, वाढदिवसा निमित्त महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून हजारो हितचिंतकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन शुभेच्छा दिल्या. तसेच मतदारसंघात प्रत्येकाने आपल्या परीने वाढदिवस साजरा करताना, कुणी निराधार संस्थेला मदत केली, कुणी आयुष्यमानचे आरोग्य कॅम्प ठेवले तर कोणी शैक्षणिक साहित्य वाटप करून सर्वसामान्य जनतेला मदतीचा हात देण्याचा प्रयत्न केला. पहाटेपासूनच



दिंद्रुड येथील साई शिल्प या त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी लोकांनी गर्दी केली.

आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश मंगला सदाशिव शेटे यांनी गेल्या बारा वर्षापासून आयुष्यमान योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील हजारो लोकांना जीवदान देण्याचे काम केले, म्हणूनच त्यांना देवदुत म्हणून संबोधले जाते, ज्या लोकांच्या मदतीला ते धावून गेले, तेच लोक आज वाढदिवसानिमित्त दिंद्रुड येथील त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी धावून आले, एवढेच नव्हे तर मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रभरात शेटे साहेबांचा वाढदिवस विविध पैलूंनी साजरा करण्यात आला सर्वसामान्य गोरगरीब जनतेला वाढदिवसानिमित्त काहीतरी मदत मिळावी हाच हेतू समोर ठेवून कुणी निराधार संस्थेला आर्थिक मदत केली, कुणी आरोग्य शिबीर ठेवले तर कोणी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले, तसेच देवदूतांना निरोगी व उदंड आयुष्याच्या प्रार्थना करण्यात आल्या.

# आई ही स्वर्गापेक्षा महान-कलम रत्न बरसमवाड

ज्योतिर्मय साहित्य

लातूर – महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक, वक्ते, व्याख्याते, मातृभक्त, जीवन गौरव पुरस्कार प्राप्त डॉ. रामकृष्ण बदने यांच्या मातोश्रीचे नुकतेच निधन त्यांच्या राहत्या घरी देवकरा ता. अहमदपूर जि.लातूर येथे अंत्यविधी झाला. साहित्यिक कलम रत्न विठ्ठल बरसमवाड यांचे ते गुरु आहेत. म्हणून डॉ. रामकृष्ण बदने यांची सांत्वन पर त्यांनी शनिवारी सायंकाळी भेट घेतली. त्यावेळेस ते आईच्या आठवणी सांगत होते. त्यांनी आजतागायत आई या विषयावर एक हजारापेक्षा जास्त व्याख्याने महाराष्ट्रात दिलेली आहेत.



सध्या ते ग्रामीण महाविद्यालय वसंत नगर येथे हिंदी विषयाचे अध्यापन करतात. ते विद्या निकेतन कमळेवाडी ता.मुखेड येथे प्राचार्य म्हणून ही कार्यरत होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अनेक समित्यावर ते सध्या सदस्य म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यात त्यांना मानणारा बुद्धिजीवी कर्मचारी, मित्रपरिवार व विद्यार्थी वर्ग फार मोठ्या प्रमाणात आहे.


त्यांचे शेकडो विद्यार्थी आज मोठमोठ्या पदावर देश-परदेशात कार्यरत आहेत. समाजोपयोगी व विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून अनेक ग्रंथाचे लेखन त्यांनी केले आहे. स्पष्ट वक्ते म्हणून ते सर्वत्र परिचित आहेत. आई ही लंगड्याचा पाय असते. वासराची गाय असते. दुधावरची साय असते. आईची सावली जगभर पसरते. आई मूळे लेकराला किंमत असते. नसता लेकरे तुटलेल्या पतंगासारखे भरकटत जातात.


असे भावनिक उद्गार त्यांनी आपल्या शिष्याजवळ बोलून दाखवले. त्यावेळी त्यांच्या भावनांचा बांध फुटला होता. त्यावेळेस गुरु-शिष्यांनी अश्रूंना वाट करून दिली. भावनेची भाषा भावनेला कळाली. कुटुंबातील सर्व व्यक्ती शांत चित्ताने ऐकत होते. त्यावेळेस कलम रत्न बरसमवाड यांनी आई ही स्वर्गापेक्षा महान आहे. तिची आठवण येतच राहणार? असे भावनिक उद्गार काढून गुरुचे चरण स्पर्श केले. म्हणून जो पर्यंत आई आहे. तोपर्यंत आईची सेवा करा.नंतर फक्त आठवणी उरतात. आता आई म्हणूनी मी कोणास हाक मारू.. असे डॉ. रामकृष्ण बदने यांनी आपल्या शिष्याला बोलताना म्हणाले.

घार हिंडते आकाशी । चित तिचे पिल्लापाशी ।।

खरोखर आम्ही आता पोरके झालो. अगोदर वडील गेले आणि आता आईने देह ठेवला. त्यामुळे जगण्यातला आनंद संपला. असे दुःखांकित होऊन ते आईच्या आठवणींमध्ये रमून गेले. आईच्या कुशीतून मी वाढलो, मोठा झालो. मी अनेक सभा, संमेलना तून रात्रीला उशिरा घरी येई. तोपर्यंत माझी आई जेवण करीत नव्हती. माझी आई आता मला कधीच दिसणार नाही.

तेव्हा त्यांचे डोळे अश्रूंनी डबडबले होते.त्यावेळेस साश्रुनयनांनी कलम रत्न विठ्ठल बरसमवाड यांनी त्यांचे सांत्वन करून निरोप घेतला.





# जात्यावरच्या ओव्या......

भरला बाजार
नही दिसले बाबा
भाऊ कारभारी झाला
वैनी म्हणे ढोर बांधा ||७९९||

भरला बाजार
मला वाटे सुना सुना
मह्या बाबाचा पटका
लई वर्षाचा दिसेना || ८००||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६३

ज्योतिर्मय साहित्य

**घरी कामधेनू पुढे ताक मागे ।**
**हरीबोध सांडूनि वेवाद लागे ।**
**करी सार चिंतामणी काचखंडे ।**
**तया मागता देत आहे उदंडे । ६३ ।**

अर्थ : एखाद्याच्या घरी कामधेनू आहे. पण तो दुसऱ्याच्या घरी ताक मागू लागला तर ही हास्यास्पद गोष्ट ठरते. त्याप्रमाणे आपल्यापाशीच असणाऱ्या भगवंताकडे दुर्लक्ष करून एखादा व्यर्थ वाद घालू लागला तर त्याचे जीवन वाया जाते. एखाद्याच्या हातात चिंतामणी आहे, परंतु तो त्याच्याकडे केवळ काचेच्या तुकड्यांची मागणी करू लागला तर अशा माणसाचे वागणे हास्यास्पद आणि मूर्खपणाचे ठरते.

( हरीबोध - परमेश्वराचे ज्ञान,
वेवाद - व्यर्थ /निष्फळ वाद,
काचखंडे - काचेचे तुकडे )








विवेचन : या आधीच्या श्लोकात समर्थांनी आपल्याला निजध्यास तुटला म्हणजे काय होते ते सांगितले. या श्लोकातही तोच मुद्दा पण वेगळ्या शब्दात ते आपल्याला समजावून सांगत आहेत. माणूस हा इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आणि वेगळा ठरतो तो त्याला मिळालेल्या बुद्धीच्या वरदानामुळे. या बुद्धीचा वापर करून तो आत्मज्ञान करून घेऊ शकतो. नराचा नारायण होण्याची क्षमता त्याच्यामध्ये आहे. असे असताना कधी कधी तो अगदी हास्यास्पद वागतो.

घरी कामधेनू आहे म्हणजे इच्छिलेले सर्व काही देणारी गोमाता आहे. पण याला त्याची जाणीवच नाही. हा दुसरीकडे ताक मागत फिरतो. इथे कामधेनू म्हणजे इच्छिलेले सर्व काही देणारा भगवंत. तो सदैव आपल्याजवळच असतो. पण याची जाणीव नसलेले अज्ञानी जीव मात्र त्याला शोधत इकडेतिकडे फिरतात.भोंदूबाबा, साधूंच्या नादी लागतात. भगवंत आपल्याजवळ आहे. त्याला शोधायला खरं तर कुठेच जायची गरज नाही. मंदिरात अंतरात तोच नांदताहे... पण ही गोष्ट आमच्या लक्षातच येत नाही. आम्हाला परमेश्वरासंबंधी जे काही ज्ञान झाले आहे, ते सोडून देऊन आम्ही व्यर्थ , कोरडे आणि निष्फळ वादविवाद करत बसतो.


समर्थ जसे कामधेनूचे उदाहरण देतात, तसेच ते चिंतामणी रत्नाचेही देतात. चिंतामणी हे एक दिव्य रत्न असून त्यामुळे जे हवे ते प्राप्त होते. परंतु काही मूर्ख माणसे मात्र अशा या दिव्य चिंतामणीच्या संपर्कात आले असताना देखील त्याच्याकडे काचेच्या तुकड्याची मागणी करतात. कामधेनू किंवा चिंतामणी ही रूपके समर्थांनी वापरली आहेत. परमेश्वर म्हणजे प्रत्यक्ष कामधेनू किंवा चिंतामणी ! इच्छिलेले देणारा. पण आम्हाला त्याचे महत्वाच कळत नाही. एकदा परमेश्वराची कृपा झाली की काही मिळवायचे बाकी राहत नाही. पण आम्ही मात्र जवळ कस्तुरी असूनही कस्तुरीच्या शोधात फिरणाऱ्या कस्तुरीमृगासारखे रानोमाळ भटकत राहतो. तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलासी अशी आमची अवस्था होते.

**(क्रमशः)**





# देहबुद्धीच्या विस्मरणाकरिता नाम



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपली आपल्याला ओळख करून घ्यायला नामस्मरण हाच उपाय आहे. परमेश्वराचा अंश प्राणिमात्राच्या ठिकाणी आहे खरा, पण हे जाणण्याची बुद्धी मात्र मनुष्यप्राण्याच्याच ठिकाणी आहे. पण त्याची अधोगती कशी होत जाते पहा : जीव मुळात परमेश्वरस्वरूपच असल्यामुळे प्रथम तो म्हणतो, ''मी तो, म्हणजे परमेश्वरच आहे.'' इथपासून घसरत तो म्हणतो, ''मी त्याचा आहे''; आणि अखेर ''त्याचा माझा काही संबंध नाही'' इथपर्यंत तो खाली येतो. याला कारण, देहबुद्धीचा पगडा वाढत वाढत शेवटी देह म्हणजेच मी, अशी आपली पक्की भावना होते. पण असे असले तरी मनुष्य अजाणता का होईना, पण खरे आहे ते ओळखल्यासारखेच बोलतो. जसे, एखाद्या इसमाचा स्नेही वारला तर लगेच तो इसम काय म्हणतो, 'आमचे स्नेही गेले !' याचाच अर्थ, समोर असलेल्या देहाला तो स्नेही समजत नसून, त्यात असणाऱ्या चैतन्याला, ईश्वरी अंशाला, तो खऱ्या अर्थाने आपला मित्र समजतो. म्हणजे अजाणता का होईना, पण खरे तेच त्याच्या तोंडून बाहेर पडते. असे असले तरी स्वत:च्या बाबतीत मात्र तो ही जाणीव कायम राखीत नाही, आणि आपण म्हणजे देहच असे समजून तो वागत असतो. याला कारण, ज्याचा खरा 'मी' आहे त्याचा विसर पडून देहबुद्धी बळकट होत गेली. आता याला उपाय हाच, की ज्या मार्गाने मी खाली घसरत आलो त्याच मार्गाने उलट वर जाणे. तेव्हा पहिली गोष्ट म्हणजे, आता मी जो देहरूप बनलो आहे, तो मी त्याचा, परमेश्वराचा आहे अशी जाणीव जागृत करणे. याच जाणिवेची परमावस्था म्हणजे 'मी तोच आहे' ही भावना होणे. हे कसे साधावे ? तर ज्याच्या विस्मरणाने माझी ही अधोगती झाली त्याचे स्मरण करणे. स्मरणाला उत्तम साधन म्हणजे भगवंताचे नाव. म्हणजे, नामस्मरणाचा ध्यास ठेवला की मी खरा कोण हे कळेल आणि स्वत:ची ओळख होईल. खरा परमार्थ हा असा अगदी सोपा आहे, पण तो योग्य मार्गाने केला पाहिजे. एखादी गाठ सोडविण्यासाठी कोणती दोरी ओढायची ते कळले पाहिजे, नाहीतर जास्तच गुंतागुंत होते, तसेच परमार्थाचे आहे.

मी कोण हे जाणले पाहिजे, म्हणजे परमात्मा कोण हे आपोआप कळते. दोघांचे स्वरूप एकच आहे. म्हणजे दोघे एकच आहेत. परमात्मा निर्गुण आहे; तो जाणायला आपल्यालाही नको का निर्गुण, देहातीत व्हायला ? म्हणून देहबुद्धी सोडली पाहिजे. कोणतीही गोष्ट आपण जाणतो म्हणजे आपल्याला त्या वस्तुरूप व्हावे लागते; त्याखेरीज जाणणेच होत नाही. म्हणून परमात्म्याला जाणण्यासाठी आपल्याला नको का परमात्मरूप व्हायला ? यालाच 'साधू होऊन साधूस ओळखावे', 'शिवो भूत्वा शिवं यजेत', असे म्हणतात.

नामस्मरणाची चांगली धुंदी आल्यावाचून 'मी पण जात नाही.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव
## नागपंचमी (भाग एक)

आपल्याकडे श्रावण हा सणांचा महिना आहे. तसा श्रावणातील प्रत्येक दिवस हा महत्त्वाचा, आनंदाचा, उत्साहाचा, आणि पारंपारिक तेचा असतो.
श्रावण महिन्यातल्या पंचमीला नागपंचमी हा सण साजरा होतो.
श्रावणे शुक्लपक्षे तु पञ्चम्यां
पूजयेन्नगान्।
गन्धपुष्पाक्षतैर्धूपैर्नैवेद्यैर्विविधैरपि॥
या दिवशी नाग देवतेची पूजा करावी. त्यांना प्रार्थना करावी, अशी कथा पुराणात सांगितली आहे.
अनन्तं वासुकिं शेषं पद्मनाभं च कम्बलम्।
शङ्खपालं धृतराष्ट्रं तक्षकं कालियं तथा॥
एतानि नव नामानि नागानां च
महात्मनाम्।
सायंकाले पठेन्नित्यं प्रात:काले विशेषत:॥
तस्य विषभयं नास्ति सर्वत्र विजयी
भवेत्॥
आपल्या श्रद्धे प्रमाणे अनंत, वासुकी, शेष पद्मनाभ, कंबल शंखपाल धृतराष्ट्र, तक्षक, कालीय या नागांना देवत्व प्राप्त आहे. यांची पूजा आणि प्रार्थना केल्याने यांच्या विषा पासून अभय मिळते आणि सर्वत्र विजय प्राप्त होतो.
■ फल प्रजनन आणि भूमीचे प्रतीक
शेतीप्रधान समाजात सर्पाचा संबंध भूमी जल व सुपिक तेशी जोडलेला आहे. जसे गंगा ही नदी असली तरी तिला गंगा देवी मानल्या जाते त्याचप्रमाणे नागांना ही दैवि अस्तित्व मानले गेले आहे.
क्रमशः

# || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ चातुर्य

चातुर्य म्हणजे हुशारी, जशी बिरबलमध्ये होती. हिचा संबंध बुद्धीशी आहे, वेळप्रसंगी जो चातुर्याने प्रश्न सोडवतो तो नक्कीच यशस्वी होतो. त्यालाच आपण हुशार म्हणून संबोधतो,यासाठी चौफेर ज्ञान आवश्यक असते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)





## लाख मोलाचा आहे धडा शहरी वास्तवाचा तिढा"

आज विद्यमान तंत्रज्ञान, वेगवान औद्योगिक व विकास यामुळे शहरे केंद्रस्थानी आली, ग्रामीण युवापिढी रोजगारासाठी शहरात धाव घेत आहेत. त्यामुळे शहरी वास्तवाचा तिढा वाढत आहे, वेगवान जीवनशैली, मानसिक ताण स्पर्धेची अंदाधुंद शर्यत वाढत आहे त्यामुळे आपण हा धडा आताच घेऊन हरवलेला मानवी संवाद आणि सहजीवन वाढवाले पाहिजे असे मला वाटते. अनेकदा कुटुंब व सहजीवनातील अलिखित नियम हे बालकडू असून त्यातूनच मूल्य, संस्कार आणि शिस्त याचे कायमचे 'नाते'तयार होते. काय पटतं ना? मर्यादा असणे म्हणजे स्वातंत्र्यावर गदा नव्हे, कारण प्रत्येक गोष्ट "चालून"जाते तेव्हा हळूहळू घरातील शिस्त आदर, परस्पर सहभाव, जबाबदारी कमी होत जाते. गरज व इच्छा यातील फरक 'शहरीकरणामुळे "धुसर होत आहे! नगरातील चंगलवादीपणा व चकाचौध डोळे दीपवून टाकते खरी, पण या लखलखाटामागे वाढते प्रदुषण नागरी सुविधावर येणारा प्रचंड ताण, कचरा प्रश्न वाहतूक कोंडी व पर्यावरणसमस्या व तिढा निर्माण होतो. सततची धावपळ, कामाचा ताण व गर्दीत प्रवास हा सोपा नाही! तुम्हाला काय वाटते? टी.व्ही वर व इतर गॅझेटच्य महाजालात साचेबंदता व एकूलतेपणा येतो हा लाखमोलाचा धडा आहे. गंभीर ईशारा आहे!! प्रत्येक मुलं, तरूण, स्त्री पुरुषाला स्वतःची "स्पेस"हवी असल्यास कौटुंबिक व सामुहिक बंध सैल होतात. अशा कालायः तस्मै मधे नातीगोती जपणे, मैत्री भाव वाढविणे, साधे सरल जगणे व ऐक्य राखणे शक्य झाले तरच आपण या नागरीकरणाच्या तिढ्यातंन सावरू व खरे सुखी जीवन जगू. आज एवढी चर्चा पुरे. ईथंच थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत राहा गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग.



# पावसाळ्यात सर्दी येणे

ज्योतिर्मय साहित्य

पावसाळ्यात सर्दी होणे सामान्य आहे. त्याची मुख्य कारणे अशी असू शकतात.

पावसात भिजणे आणि ओल्या कपड्यांत जास्त वेळ राहणे.

तापमानातील अचानक बदल (एसीमधून बाहेर येणे किंवा उलट).

विषाणूंचा (व्हायरस) संसर्ग.

रोगप्रतिकारक शक्ती कमी असणे.

सर्दी झाल्यास काय करावे?

कोमट पाणी भरपूर प्या.

गरम सूप, हळदीचे दूध किंवा आले-तुळशीचा चहा घ्या.

पुरेशी विश्रांती घ्या.

गरज असल्यास कोमट पाण्याची वाफ घ्या.

थंड पेये आणि खूप थंड पदार्थ काही दिवस टाळा.

डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

३५ दिवसांपेक्षा जास्त सर्दी टिकली तर.

१०१ (३८.३) पेक्षा जास्त ताप आला तर.

श्वास घेण्यास त्रास होत असेल.

छातीत दुखत असेल किंवा कफात रक्त दिसत असेल.

पावसाळ्यात सर्दी टाळण्यासाठी आणि लवकर बरी होण्यासाठी आणखी काही

उपाय:

पावसात भिजल्यानंतर लगेच कोरडे कपडे घाला.

केस ओले राहू देऊ नका; शक्य तितक्या लवकर कोरडे करा.

हात वारंवार साबणाने धुवा, कारण सर्दीचे विषाणू हातांद्वारे पसरतात.

पुरेशी झोप (७८ तास) घ्या.

आहारात व्हिटॅमिन असलेली फळे (संत्री, मोसंबी, आवळा) आणि प्रथिने (डाळी, अंडी, दूध) घ्या.

कोमट पाण्याने गुळण्या केल्याने घशाला आराम मिळू शकतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

धूळ, धूर आणि थंड वारा यापासून शक्यतो बचाव करा.

पुरेसे पाणी प्या, शरीर हायड्रेट ठेवा.

रुमाल किंवा टिश्यू वापरा आणि वापरल्यानंतर हात स्वच्छ धुवा.

शिंकताना किंवा खोकताना तोंड आणि नाक झाका.

पावसाळ्यात सर्दी टाळण्यासाठी २० घरगुती उपाय

सकाळी कोमट पाणी प्या.

आले, तुळस आणि गवती चहा घ्या.

हळद घातलेले कोमट दूध रात्री प्या.

व्हिटॅमिन असलेली फळे (आवळा, संत्री, मोसंबी) खा.

रोज ७८ तास झोप घ्या.

पावसात भिजल्यास लगेच कोरडे कपडे घाला.

केस पूर्णपणे कोरडे करा.

हात साबणाने वारंवार धुवा.

गरम सूप आणि हलका आहार घ्या.

थंड पाणी, आईस्क्रीम आणि अतिथंड पेये टाळा.

दिवसातून २३ वेळा कोमट पाण्याने गुळण्या करा.

नाक बंद असल्यास वाफ घ्या.

घर आणि कपडे कोरडे व स्वच्छ ठेवा.

गर्दीच्या ठिकाणी आवश्यक असल्यास मास्क वापरा. पुरेसे पाणी प्या., ताजी फळे, हिरव्या भाज्या आणि प्रथिनयुक्त आहार घ्या.

**(क्रमशः)**

# प्रभातपुष्प

**षटकोळी माझी**

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**उंच माझा झोका**

नागपंचमीच्या दिनी घेते
सखींसवे मी आनंदाने
उंच माझा झोका
सान होवूनी पुन्हा
खेळात रमताना चुके
काळजाचा या ठोका

नेहमीच जाई खरा
उंच माझा झोका
आनंदी या जीवनाचा
जपले मनी सदा
सुंदर,छान क्षण
मान जरा विसावण्याचा

# आजादी की जंग, फिल्मों के संग देशभक्तीसह स्फूर्तीचा संचार

## स्वातंत्र्यदिनानिमित्त रामदास कामत यांची जालनेकरांना भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

जालना - भारताचे वीर जवान देशाचे रक्षण कसे प्राणपणाने करतात याचे अतिशय प्रेरणादायी चित्रवर्णन करत आजादी की जंग, फिल्मों के संग या दृकश्राव्य कार्यक्रमाने जालनेकरांना नवी स्फूर्ती दिली.

मुंबई येथील प्रख्यात वक्ते, लेखक व नाट्यदिग्दर्शक रामदास कामत यांनी १४ ऑगस्ट रोजी जेईएस महाविद्यालयात हा कार्यक्रम सादर केला. भारताने शत्रूंसोबत लढलेल्या घनघोर युद्धांचा ज्वलंत इतिहास कामत यांनी ओघवत्या वक्तृत्वातून आणि विविध चित्रपटांच्या दृश्यांमधून जिवंत केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, तसेच रंगकर्मी मिलिंद दुसे, सतीश लिंगडे, विनोद जैतमहाल, प्रा. बी. जी. श्रीरामे, प्रा. डॉ. यशवंत सोनुने आदींच्या प्रमुख उपस्थितीसह एनसीसीचे विद्यार्थी व प्राध्यापक याप्रसंगी




मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा आणि आजवर लढल्या गेलेल्या युद्धांचा इतिहास सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवणारा हा एक अप्रतिम कार्यक्रम आहे.

आजच्या शालेय, युवा पिढीला, भारत चीन, भारत पाक युद्धात आपल्या शूर जवानांनी गाजवलेल्या अभूतपूर्व शौर्याचा परिचय व्हावा हाच यामागे उद्देश आहे, असे रामदास कामत यांनी या वेळी सांगितले. सेलिब्रिटी, हिरो या शब्दाचा नेमका अर्थ जाणून, खरे सेलिब्रिटी, हिरो कोण आहेत हे युवापिढीला कळले पाहिजे. कारण आपल्या जवानांच्या शौर्याची माहिती देणारे धडे शालेय पाठ्यपुस्तकात नाहीत, म्हणून या शौर्यगाथा तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी कामत यांनी किस्मत, हकीकत ते उरी द सर्जिकल स्ट्राईक पर्यंतच्या युद्धपटांतील निवडक दृश्यांचा या कार्यक्रमात समावेश केला आहे. हा कार्यक्रम पाहून सैन्यदलात जाण्याची आणि देशसेवा करण्याची प्रेरणा मिळाली, अशा प्रतिक्रिया या वेळी अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

### अंगावर शहारे, डोळ्यांत पाणी

१९६२ भारत-चीन, १९४७, १९६५, १९७१ आणि १९९९ भारत-पाक या युद्धांचा इतिहास सांगत आणि शहीद, हिंदुस्तान की कसम, बॉर्डर, गाझी अटॅक, एलओसी कारगिल या युद्धपटांतील दृश्ये दाखवत रामदास कामत यांनी प्रेक्षकांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत चेतवली. त्यांच्या तेजस्वी शब्दांनी प्रेक्षकांच्या अंगावर शहारे येत होते, युद्धाची दृश्ये पाहून रक्त सळसळत होते आणि जवानांचे बलिदान पाहून अभिमानाने क्षणोक्षणी डोळ्यांत पाणी दाटत होते.

### सर्व निधी सैनिकांच्या कल्याणासाठी

रामदास कामत यांना या कार्यक्रमासाठी मिळणारे संपूर्ण मानधन आणि प्रेक्षकांना आवाहन करुन जमा झालेली रक्कम ते सैनिक कल्याण निधीला देणगी देतात. त्याप्रमाणेच जालन्यातील कार्यक्रमाचे मानधन आणि जमा झालेली रक्कमही ते सैनिक कल्याण निधीला देणार आहेत. आजवर भारतभरात केलेल्या १४ प्रयोगांमधून मिळालेले सुमारे ८ लाख रुपये त्यांनी आर्मी वेल्फेअर फंडात जमा केले असून त्याबद्दल त्यांना देशाच्या संरक्षण विभागाकडून प्रशंसापत्रही मिळालेले आहे.

### समारोप संपूर्ण राष्ट्रगीताने

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे महाकवी रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले संपूर्ण तीन ते साडेतीन मिनिटांचे राष्ट्रगीत रामदास कामत यांनी पडद्यावर दाखवून या कार्यक्रमाचा अतिशय रोमांचक समारोप केला.

# प्रत्येकाने देशासाठी योगदान देणे गरजेचे-ब्रिगेडियर अनुप बरबरे

## श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. एनसीसी ग्रुप हेडक्वार्टर्स, छत्रपती संभाजीनगरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनूप बरबरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, संयुक्त सचिव श्री.अद्वैत मंगरुळे व मुख्याधिकारी कमोडोर सुरेंद्र गोचके उपस्थित होते. एनसीसीच्या मुला-मुलींच्या कॅडेट्सनी उत्कृष्ट शिस्तबद्ध संचलन सादर केले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रनिर्माणात योगदान देण्याचे तसेच आपली प्रमुख कर्तव्ये सचोटीने पूर्ण करण्याचे आवाहन ब्रिगेडियर बरबरे यांनी केले. अध्यक्षांनी शिस्त, बांधिलकी, देशभक्ती व कठोर परिश्रम ही विद्यार्थ्यांची महत्त्वाची मूल्ये असल्याचे सांगितले. यावेळी सात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पेटंट मिळविणाऱ्या पेटंटधारक प्राचार्य व प्राध्यापकांचा सत्कार







करण्यात आला. देशभक्तीपर नाटिका, गीते, नृत्य व वाद्यवृंदाने कार्यक्रमाची सांगता झाली. प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. विजय भोरडे यांनी केले.




# काण्व ब्राह्मण समाजातर्फे वृक्षारोपण

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - ८० वा स्वातंत्र्यदिन व संस्थेच्या ५३ व्या वर्धापनदिनानिमित्त धुळे-सोलापूर हायवेलगत टेकडी जवळ वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी निसर्गाचा समतोल राखावा म्हणुन विविध प्रकारच्या देशी वनस्पती जसे आजन वृक्ष, काळा शिरीष, काटे सावर, वावळ, कवठ, पांगरा, बिजा, डीकामली, कुसुम, अंजन, वारस,पांढरा शिरीष, कुडा, वायवरण आदी ३५-४० वनस्पतीचे रोपण करण्यात आले. तसेच या रोपांचे संवर्धनही नियमितपणे भेटी देऊन संस्था करणार आहे.

यावेळी वृक्षारोपण समिती प्रमुख तुलशीदास जयपूरकर यांनी बदलते हवामान, प्रदूषण, नैसर्गिक असमतोल आदी समस्यांवर मात करण्यासाठी वृक्षारोपण आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष सीएस लक्ष्मीकांत जयपुरकर, सल्लागार पुरुषोत्तम भाले, सचिव धीरज देशपांडे, कोषाध्यक्ष धनंजय सीमंत, जनसंपर्क प्रमुख संगीता कागबट्टे, सहसचिव सौ विजयालक्ष्मी भाले-कुलकर्णी, प्रवीण शिरोडकर,आनंद बुगदे, महेंद्र मानवतकर, देशपांडे, सविता आचार्य, ॲड सुरेश कुलकर्णी, सौ अनुजा दैठणकर, संदेश देशपांडे, राहुल देशपांडे आदींनी प्रयत्न केले.

# जि.प.शाळा मोहिते मळा शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

मोहिते मळा : स्वातंत्र्यदिनानिमित्त शालेय परिसर रांगोळी व फुलांनी सजवण्यात आला होता.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. अमृता मोहिते ग्रामपंचायत सदस्य श्री. कुमार मोहिते यांच्यासह मोहितेमळा मधील सर्व मान्यवर ग्रामस्थ पालक व परिसरातील अनेक लोक ध्वजारोहणासाठी उपस्थित होते. मोहितेमळा येथील ज्येष्ठ नागरिक श्री. लालासो पुंडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विविध घोषणांनी शालेय परिसर दुमदुमून गेला.मुलांची भाषणे व कवायत संचलन केले.त्याचबरोबर देशभक्तीपर व सामाजिक संदेश देणारा सांस्कृतिक कार्यक्रम फार उत्साहात पार पडला. नवसाक्षरांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



शालेय गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचा उहाफ़ोह यानिमित्ताने करण्यात आला. श्री कुमार मोहिते यांनी आपल्या मनोगतामध्ये शाळेचा पट वाढवण्यासाठी शाळेबरोबर पालक व शिक्षक यांची जबाबदारी व गुणवत्ता वाढीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे मान्य केले.शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा ग्रामपंचायत सदस्य आणि इतर मान्यवरांच्या कडून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले . त्याचबरोबर शालेय रंग कामासाठी मोहितेमळा मधील उपस्थित सर्वांनी लोकसहभाग नोंदवला. शाळेच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे मान्य केले मुलांच्या कलागुणाचे कौतुक करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाराम गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शाळेच्या उपशिक्षिका सौ रंजना सानप यांनी मानले. अशाप्रकारे मोहिते मळा मधील स्वातंत्र्य दिन उत्साहात पार पडला.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.


सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495





## आतुरता कृष्णजन्माची.....

श्रीमद्भागवत महापुराण, दशम स्कंध, तृतीय अध्याय यातील श्रीकृष्ण-जन्मप्रसंगी वसुदेव आणि देवकी यांनी केलेल्या स्तुतीतील काही निवडक श्लोक (वसुदेवांचे श्लोक १३-२०) आणि देवकीचे (२४-२७ )असे येथे घेतले आहेत. ही स्तुती केवळ कृष्णाच्या बालरूपाची स्तुती नाही; वसुदेवांना त्या क्षणी आपल्या समोर जन्मलेला पुत्र हा प्रत्यक्ष परब्रह्मच आहे, याचे ज्ञान होते. त्यामुळे या स्तुतीत सांख्य, वेदान्त, प्रकृती-पुरुष, माया, त्रिगुण, काल आणि आत्मतत्त्व यांचे अत्यंत गहन तत्त्वज्ञान आले आहे.

श्रीकृष्ण जन्मस्तुती
१. वसुदेव म्हणतात –
विदितोऽसि भवान् साक्षात् पुरुषः प्रकृतेः परः ।
केवलानुभवानन्द स्वरूपः सर्वबुद्धिदृक् ॥ १३ ॥

हे प्रभो! आपण मला प्रत्यक्ष ज्ञात झाला आहात. आपण प्रकृतीच्या पलीकडील परमपुरुष आहात. आपण केवळ स्वतःच्या अनुभूतीत येणाऱ्या अखंड आनंदाचे स्वरूप आहात आणि सर्वांच्या बुद्धीला जाणणारे, सर्व बुद्धींचे साक्षी आहात.

इथे वसुदेवांची दृष्टी बदलते. त्यांना समोर दिसत आहे ते देहाने बालक, पण अंतर्दृष्टीला जाणवते ते परब्रह्म.

यातील–"प्रकृतेः परः"म्हणजे जो प्रकृतीच्या तीन गुणांनी–सत्त्व, रज आणि तम यांनी–बद्ध नाही.

"सर्वबुद्धिदृक्"हा शब्द अत्यंत विलक्षण आहे. परमात्मा बुद्धीने जाणला जाणारा एखादा विषय नाही; उलट बुद्धीला प्रकाश देणारा तो साक्षी आहे.

डोळे जग पाहतात, पण डोळ्यांना कोण पाहतो?

मन विचार करते, पण मनाच्या विचारांची जाणीव कोणाला आहे?

बुद्धी निर्णय घेते, पण बुद्धीचा निर्णय झाल्याचे कोण जाणते? तो साक्षीचैतन्य-भगवान.

(क्रमशः)

# विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



## आजचा निर्णय उद्याचं भविष्य घडवतो

कधी कधी आयुष्य आपल्याला मोठे प्रश्न विचारत नाही... ते फक्त एक छोटासा क्षण समोर ठेवतं.
"आता काय करणार?"
त्या एका क्षणात घेतलेला निर्णय कधी कधी संपूर्ण आयुष्याची दिशा बदलून टाकतो.
आज फोन करायचा की नाही?
आज माफी मागायची की अहंकार जपायचा?
आज आई-बाबांसोबत दोन मिनिटं बसायचं की "वेळ नाही" म्हणून निघून जायचं? आज मुलाच्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं की मोबाईलमध्ये व्यस्त राहायचं? आज स्वप्नासाठी एक पाऊल पुढे टाकायचं की पुन्हा "उद्यापासून" म्हणायचं?
हे क्षण छोटे असतात...
पण त्यांची किंमत अनेकदा उद्या कळते.
उद्याचं आयुष्य याच छोट्या निर्णयांवर उभं असतं. आपण अनेकदा भविष्याची चिंता करतो. "माझं पुढे काय होईल?" असा प्रश्न विचारतो. पण भविष्याची काळजी करण्यापेक्षा आज आपण काय करतोय, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.
कारण उद्याचा दिवस आजच्या कृतींचं प्रतिबिंब असतो.
एका मुलाला अभ्यास करायचा असतो. पण तो रोज म्हणतो, "आज राहू दे, उद्यापासून नक्की अभ्यास करेन." उद्या पुन्हा तसंच होतं. दिवस जातात, महिने जातात आणि परीक्षा जवळ येते.
दुसरा मुलगा रोज फक्त एक तास अभ्यास करतो. पहिल्याला वाटतं, "एक तासाने काय फरक पडणार?" पण काही महिन्यांनी त्या एका तासाचं रूपांतर मोठ्या तयारीत झालेलं असतं.फरक प्रतिभेचा नसतो; फरक आज घेतलेल्या निर्णयाचा असतो.नात्यांमध्येही हेच होतं. कधी एखाद्या आपल्या माणसाशी गैरसमज होतो. आपण मनात म्हणतो, "नंतर बोलू."
पण तो "नंतर" कधीच येत नाही. अहंकार वाढत जातो. दूरावा वाढत जातो. आणि एक दिवस फोन करण्यासाठी माणूसच उरत नाही. तेव्हा मनात एकच विचार येतो "त्या दिवशी मी फक्त एक फोन केला असता तर..." पण काही निर्णयांना पुन्हा संधी मिळत नाही.
म्हणून आजचं प्रेम उद्यावर ढकलू नका. आजचं कौतुक उद्यावर ठेवू नका. आजचं "माफ कर" उद्यावर ढकलू नका. कारण उद्याची खात्री कोणालाच नसते. कधी कधी आयुष्य बदलण्यासाठी मोठा निर्णय घेण्याची गरज नसते. फक्त एक छोटासा निर्णय पुरेसा असतो–
आजपासून स्वतःवर विश्वास ठेवण्याचा.
आजपासून वाईट सवय सोडण्याचा.
आजपासून आरोग्याची काळजी घेण्याचा.
आजपासून रोज थोडं शिकण्याचा.
आजपासून आपल्या माणसांना वेळ देण्याचा.
हे छोटे निर्णयच काही वर्षांनी आपली मोठी ओळख बनतात.
झाड एका दिवसात मोठं होत नाही. रोज थोडं वाढतं. आपल्यालाही तसंच वाढायचं असतं.
आजचा एक चांगला निर्णय म्हणजे उद्याच्या चांगल्या आयुष्याची पहिली वीट.
"उद्याला सुंदर बनवायचं असेल, तर आजच्या हातात असलेला क्षण प्रेमाने आणि धैर्याने जगावा लागतो."
ज्या स्वप्नासाठी सुरुवात करायची आहे, आजच पहिलं पाऊल टाका. कारण... उद्या कदाचित वेळ असेल; पण आजसारखी संधी असेलच असं नाही.
जेव्हा तुम्ही भीती आणि आळसावर मात करून स्वतःच्या आयुष्यासाठी एक खंबीर आणि योग्य निर्णय घ्याल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.परिस्थितीला दोष देणे थांबवा, आजच एक सकारात्मक आणि धाडसी निर्णय घ्या... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात स्वतःच्या हातांनी स्वतःचे सुवर्ण भविष्य घडवा!



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'आत्या' : माहेरच्या मायेचा एक हळवा कोपरा

पुढे......
आईच्या माहेरची माणसं आपल्याला 'मामा', 'मावशी', 'आजोबा', 'आजी' म्हणून लहानपणापासूनच जवळची वाटतात. पण बाबांच्या माहेरची माणसंही तितकीच आपली असतात, हे जाणवायला कधी कधी थोडा वेळ लागतो. कारण वडील स्वतःच्या भावना फारशा बोलून दाखवत नाहीत; त्यांच्या माहेरच्या आठवणींचा कप्पा ते सहज उघडत नाहीत. पण जेव्हा आत्या घरी येते, तेव्हा बाबांच्या चेहऱ्यावर अचानक एक वेगळंच निष्पाप बालपण उमलतं.
"अरे, तू अजूनही तसाच आहेस!" आत्याने बाबांना असं म्हटलं की आपण आश्चर्याने बाबांकडे पाहतो. कारण आपल्यासाठी ते शिस्तप्रिय बाबा असतात, पण आत्यासाठी तो अजूनही तिचा लहान भाऊ असतो! त्यांच्या बालपणीच्या खोड्या, भांडणं, रुसवे-फुगवे, शाळा, खेळ, आईचा धाक आणि वडिलांची शिस्त... सगळं काही तिच्या स्मरणात ताजंतवानं आणि जिवंत असतं. जसा अनेक वर्षांपूर्वीचा एखादा फोटोंचा अल्बम पाहताना आठवणी जाग्या होतात, तसाच बालपणीच्या आठवणींचा अल्बम आत्या आली की उघडला जातो. म्हणूनच आत्या म्हणजे केवळ एक नातं नाही; ती आपल्या वडिलांच्या हरवलेल्या बालपणाची खरीखुरी साक्षीदार असते. (क्रमशः)

# नागपंचमी.. काळानुरूप काही बदल गरजेचे

ज्योतिर्मय साहित्य

सणांचा उत्सवांचा राजा मानल्या जाणाऱ्या निसर्गाचे रूप बदलून, जीवाना संजीवन देणारा सर्व प्रणिमात्राना संतुष्ट करून उत्साह भरणाऱ्या अशा या श्रावण महिन्यातील नागपंचमी हा पहिला सण! एक महत्वाचा हिंदू सण आहे, जो श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पंचमीला साजरा केला जातो.या सणाला पौराणिक महात्म्य आहे.

यमुना नदीतील कालिया नागाचा पराभव करून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित नदीच्या वर आले. तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. तेव्हापासून नागपंचमी हा सण साजरा केला जाऊ लागला. हिंदू धर्मामध्ये सर्प ,नाग हे देवतेच्या स्वरूपात पूजले जातात. नाग हे भगवान शिव आणि विष्णू या देवतांना अत्यंत प्रिय आहेत. भगवान शंकरांच्या गळ्यातील वासुकी नाग. तर भगवान विष्णू शेष या नागावरती विसावतात. यामुळे सर्पांना दिव्य स्थान प्राप्त झाले आहे.

श्रावण महिना हा शिवपूजेसाठी महत्त्वाचा मानला जातो आणि नागपंचमीला सर्पांची पूजा करून शिव आणि विष्णू दोघांचाही आशीर्वाद मिळतो अशी भविकांची श्रद्धा आहे. म्हणून या दिवशी नागांची पूजा करण्याची प्रथा आहे.

यशिवाय दुसरे सामाजिक कारण सुद्धा या नागाची पूजा करण्यामागे आहे बरकां! यांनाशेतकऱ्यांचा मित्र मानले जाते. नाग, साप हे शेतकऱ्यांसाठी उपयुक्त मानले जातात कारण ते पिकांचे नुकसान करणारे उंदीर खातात. काही लोकांचा असा विश्वास आहे की नागपंचमीच्या पूजेने सर्पदंशापासून संरक्षण मिळते.

नागपंचमी हा महाराष्ट्रात विशेषतः साजरा केला जाणारा एक महत्वाचा सण आहे, जिथे स्त्रिया आणि पुरुष दोघेही यात उत्साहाने भाग घेतात.

या दिवशी विशेषतः खेड्यात.. घराच्या दारावर किंवा भिंतीवर शेणाने किंवा रंगवून नागाची चित्रे काढली जातात. मनोभावे मातीच्या किंवा धातूच्या नागाची पूजा केली जाते.काही वेळा तर गारुडी जिवंत नाग घेऊन येतात आणि मुली,सुवासिनी त्याची हळदी कुंकू,अक्षता, दुर्वा,फुले,दूध,लाह्या वाहून मनोभावे पुजा करतात. नागाला भाऊ मानतात.त्याच्यासाठी उपवास करून त्याला रक्षण करण्यासाठी प्रार्थना करतात नवीन कपडे, दागिने घालून हाताना मेंदी काढून एकत्र जमून खूप खेळ खेळतात. उंच झोके घेतात.

" चल ग सखे
वारुळाला,वारुळाला..
नागोबाला
पूजायला,पूजायला.."

अशी गाणीही गातात.फेर धरतात. झिम्मा, फुगड्या असे पारंपारीक खेळ खेळतात. या दिवशी तव्यावर भाजलेले, कापलेले, चिरलेले असे पदार्थ खात नाहीत. म्हणजेच तवा,चाकू, विळी , सुरा या धार असलेल्या गोष्टी वापरत नाहीत. शेतकरी कोयता,नांगर या गोष्टी वापरत नाहीत. यामुळे नागाना इजा पोहोचु शकते ही त्यामागची भावना!

आपले पूर्वज खरोखरच खूप हुशार होते. प्रत्येक सण, उत्सव .. रुढी,परंपरा बनवताना त्यासाठी काही खास गोष्टी नेमल्या आहेत. त्यांचे पालन करताना आधी आपण त्या व्यवस्थीत समजून घेणे महत्वाचे आहे. आणि काळानुरूप थोडेफार चांगले बदल करण्याचीही आवश्यकता आहे.

अगदी ऋतुतील हवामानानुसार खानपान, वेशभूषा योजल्या आहेत. जसे उन्हाळ्यात पांढरे किंवा हलक्या रंगाचे,सूती कपडे घालावेत म्हणूनच पाडव्याला,होळीला पांढरे वस्त्र घालतात. बाळाला सुद्धा शीतल शिमगा म्हणून पांढरे ,सूती झबले घालून केशर शिंपडतात. थंड वाटावे, हवेतील उष्णता बाधू नये हाच त्यामागे

उद्देश असावा. थंड साखरेच्या गाठी.. हार घालतात म्हणजे नववर्षाची सुरुवाताच गोडाने करून उष्णताही सुसह्य होते. तर थंडीत याच्या अगदी उलट म्हणजे संक्रांतीचेच घ्याना ! काळे कपडे घालायचे, उष्णता निर्माण होणारे तीळ, गूळाचे पदार्थ खायचे.फक्त इतकेच नाही तर आताचे शेअरिंग सुद्धा त्यांनी एकमेकांना तिळगुळ देणे,वाण देण्यातून सांगितले आहे. देवाच्या पूजे बरोबर धनधान्य, प्राणीमात्र, निसर्ग यांच्या पूजेलाही तितकेच महत्व दिले आहे. नारळी पौर्णिमेला निसर्गातील सागराची

पूजा ,वटपौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा, आवळीभोजन,गोमाता पूजन, चातुर्मासात गरुड पूजन,पोळ्याला बैलाची पुजा,तर नागपंचमीला नागपूजा ! अशा निसर्गातील




सर्वरूपांच्या पूजा करण्यामागे त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा मुख्य उद्देश!

पण आपण त्यांना समजून न



॥ आपली संस्कृती ॥
सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
मो. 95034 34424

घेता काहीजण प्रथा या नावाखाली तंतोतंत पाळतात तर काहीजण थोतांड मानून सोयीस्करपणे ते टाळतात. आजच्या नागपंचमीच्या सणाचेच उदाहरण घेऊया ना?

पुर्वी एकत्र कुटुंब पद्धती, त्यातून आपली भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान! त्यामुळे स्त्रियांना सणासुदीलाच गोडाधोडाचे खायला मिळायचे. नटूनथटून पूजेच्या, हळदीकुंकवाच्या निमित्तानेच घराबाहेर पडून मैत्रिणींना भेटता यायचे. म्हणून नागाच्या पूजेच्या निमित्ताने हे साध्य व्हायचे. दुसरी गोष्ट म्हणजे स्त्रियांना माहेर ,माहेरची माणसे खूप प्रिय असतात. मग नागाला भाऊ मानुन त्याला पूजायच्या निमित्ताने त्याची भीती जाऊन उलट जवळीक निर्माण होते. खरे तर साप ,नाग हे आपल्या खुप उपयोगी असतात. सापाच्या कातीला..त्वचेला तर खुप किंमत आहे. त्या पासून अनेक प्रकाराची औषधे बनवली जातात

त्या काळी लाईट्स नसल्यामुळे या दिवसात अंधार असायचा. कारण श्रावणात पावसाचे काळे ढग असल्याने अंधार जास्त असायचा. मग त्यामुळे घरातसुद्धा जास्तच अंधार असायचा. तापलेली जमीन पावसाच्या थंडगार शिडकाव्यामुळे थोडीशी शांत,थंड होते आणि आतील साप,नाग बाहेर पडतात.

आणि लोकांच्या दृष्टीपासून वाचण्यासाठी अंधारात जास्त राहतात. स्वयंपाक घरात सुद्धा पुरेसा उजेड नसायचा. हवा दमट असायची, अशावेळी ते जर विळी, सुरी किंवा काळ्या लोखंडाच्या तव्यावर असतील तर त्यांना अग्नीपासून धोका होऊ नये,म्हणून भाजणे, कापणे असे या दिवशी करत नसत. आता लाईट्स भरपूर असल्यामुळे खरेतर याची गरज नाही.हे बदलले जाऊ शकते.

नाग खरेतर दूध पित नाही. तरीही विनाकारण केवळ प्रथा म्हणून त्याला हळदी,कुंकू,दूध, लाह्या ... वाहून एकप्रकारे त्याला त्रासच देतात.उलट या दिवशी त्याला दुखवू नये,त्रास देऊ नये. उलट त्याचे रक्षण करावे.

सणाचा मुख्य उद्देश एकत्र येणे,एकीची भावना निर्माण करणे हाच असतो. म्हणून या दिवशी आवर्जून नातलग किंवा मित्र,मैत्रिणींच्या भेटी घेतल्या, तर या सणाचा हा उद्देश छान सुफळ होईल. सध्याच्या धावपळीच्या काळात आपल्या शेजारील लोकांकडे पहायला देखील आपल्याला सवड नसते तर नातलगांना भेटणे तर दूरचीच गोष्ट! या निमित्ताने भेटलो तर प्रेम, जवळीक,आपुलकी नक्कीच वाढेल.

आता मोठ्या शहरात बरेच ठिकाणी सर्पोद्याने खास बनवली आहेत. तिथे विविध प्रकारचे साप,नाग,अजगर पहायला मिळतात. शक्य असेल तर मुलांना तिथे घेऊन जाऊन दाखवून त्यांची माहिती सांगावी. साप पकडण्याचे खास प्रशिक्षण दिले जाते. त्यांचे खास नंबर सुद्धा असतात. कोणाला दिसले तर घाबरून न जाता या सर्पमित्राना बोलावावे म्हणजे ते व्यवस्थित पकडून त्यांना नीट सुरक्षित जागी सोडतात आणि त्यांची काळजी घेतात. सगळेच साप विषारी नसतात त्यामुळे विनाकरण त्यांची भीती बाळगु नये. ते मानवाचे मित्रच असतात. विनाकारण त्यांना त्रास दिला तरच ते हानी पोहोचवतात. नाग खरेतर दूध पित नाही,लाह्याही खात नाही.

नागाला पाजायच्या ऐवजी तेच दूध एखाद्या गरजू , भुकेल्या मुलाला प्यायला दिले , खाऊ दिला तर जास्त पुण्य लाभेल. जिवंत नागाच्या ऐवजी मातीचा नाग बनवून त्याची पूजा करावी. तशीही आपल्या हिंदू संस्कृतीत मूर्तीची पूजा केली जातेच. दुसऱ्या दिवशी कुंडीत किंवा जमिनीत त्याचे विसर्जन करून त्यात आठवण म्हणून हवे तर एखादे छानसे रोप लावावे. त्यामुळे निसर्गाचे ही आभार मानले जातील आणि आपल्यालाही शुद्ध हवा, सुंदर निसर्ग पहायला मिळेल आणि सामाजिक बांधिलकीही जपणे होईल. काळानुसार आपणही बदल करणे गरजेचेच आहे असे मला वाटते.

***

# सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर / गोकुळसिंग राजपूत- सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ८०वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य डॉ. माहिन इद्रिस मुलतानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद सुधाकर वानखेडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. जियाउल हक तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांच्या हस्ते पुष्पहार



अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य डॉ. माहिन इद्रिस मुलतानी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन करून तिरंग्याला मानवंदना दिली. स्वातंत्र्य दिनानिमित्त डॉ. माहिन मुलतानी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना स्वातंत्र्याचे महत्त्व, देशाची एकता व अखंडता तसेच नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य सेवक अनिल महाजन व आरोग्य सेवक सोमासे यांनी तंबाखू व गुटखा सेवनाच्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. तंबाखूजन्य पदार्थांमुळे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम, विविध आजारांचा धोका तसेच व्यसनापासून दूर राहण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी उपस्थितांनी तंबाखू व गुटखामुक्तीची शपथ घेतली.

दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद सुधाकर वानखेडे यांनी जिल्हा परिषद सदस्य डॉ. माहिन इद्रिस मुलतानी व सोयगाव पंचायत समितीच्या सभापती मीराबाई उत्तम चव्हाण यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

कार्यक्रमास प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद सुधाकर वानखेडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. जियाउल हक, गावातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात पार पडला.




# स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला लायन्सतर्फे 'माँ तुझे सलाम' देशभक्तिपर संगीतमय कार्यक्रम संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रप्रेमाची भावना जागविणाऱ्या मराठी व हिंदी देशभक्तिपर गीतांची सुरेल मैफल 'माँ तुझे सलाम' तापडिया नाट्यमंदिरात रंगली. भारत सरकारच्या 'हर घर तिरंगा' अभियानाच्या भावनेला संगीताची जोड देत लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर वाळूजच्या वतीने शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला २५० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावत देशभक्तिपर गीतांचा आनंद घेतला.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग, बलिदान आणि संघर्ष यांचे स्मरण करून देणारी देशभक्तिपर गीते या कार्यक्रमात सादर करण्यात आली. स्वातंत्र्य म्हणजे केवळ उत्सव नसून देशाप्रती कर्तव्यभावना, राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि राष्ट्रनिष्ठा अधिक दृढ करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमात नीरज वैद्य, अरविंद पिंगळे, संगीता भावसार, संदीप डोलारकर आणि विनय याडकीकर यांनी मराठी व हिंदीतील लोकप्रिय देशभक्तिपर गीतांची बहारदार मेजवानी सादर केली. संगीत संयोजन राजेश भावसार यांनी केले, तर कार्यक्रमाची संकल्पना व निर्मिती विनय याडकीकर यांची होती. विविध देशभक्तिपर गीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. देशभक्तीच्या सुरांनी तापडिया नाट्यमंदिरातील वातावरण भारून गेले आणि स्वातंत्र्यसैनिक तसेच देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना संगीतमय अभिवादन करण्यात आले.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून राष्ट्रध्वजाप्रती सन्मान आणि देशाबद्दलचा अभिमान व्यक्त करण्याचा संदेश देण्यात आला. विशेषतः युवा पिढीमध्ये राष्ट्रप्रेम, देशासाठी योगदान देण्याची भावना आणि स्वातंत्र्याचे महत्त्व रुजविण्यासाठी अशा सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.


कार्यक्रमाला पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ला. राजेश राऊत, डिस्ट्रिक्ट कॅबिनेट कोषाध्यक्ष ला. मोरेश्वर कुलकर्णी, ला. चारूलता कुलकर्णी, ला. प्रदीप गर्गे, ला. शेखर तोरणेकर, ला. राधा तोरणेकर, ला. जयदीप घुगे, ला. मिलिंद दामोदरे, ला. संजीव गुप्ता, ला. राजेश जाधव, ला. महेंद्र खानापूरकर, ला. मीरा खानापूरकर, ला. सतीश देशपांडे, ला. उषा देशपांडे, ला. प्रवीण काला, ला. अभिजीत हिरप, ला. विशाल झंवर, ला. मयूर जालनावाला, ला. विनोद अग्रवाल, ला. मनीष बंग, नगरसेविका माधुरीताई अदवंत व कीर्तीताई शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्लबचे मार्गदर्शक तथा डिस्ट्रिक्ट कॅबिनेट सेक्रेटरी ला. जितेंद्र महाजन, राजेंद्रसिंह रकवाल, ला. दिनेश पाटील, ला. उदय देशपांडे, ला. अशोक जगधने, ला. जयराज पाटील, क्लबचे अध्यक्ष ला. अशोक गुरनाळे, सचिव ला. बाबासाहेब निकम, कोषाध्यक्ष ला. दयाल डिडोरे, उपाध्यक्ष ला. राजाराम जाधव, ला. योगेश धोत्रे, ला. प्रदीप देशपांडे आणि ला. अशोक भालेकर यांच्या सहकार्याने हा भव्य कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

तसेच क्लबचे सदस्य ला. संतोष काथार, ला. सुनील राका, ला. ज्ञानेश्वर काळे, ला. डॉ. पंडित पळसकर, ला. डॉ. धनंजय घुनावत, सीए शशांक तोलवाणी, ला. रत्नाकर म्हस्के, स्वप्निता महाजन, ज्योती पाटील, सुलभा देशपांडे, प्रतिभा गुरनाळे, मोहिनी डिडोरे, सुषमा काथार व सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांचा सहभाग होता. देशभक्तीच्या सुरांनी भारलेली 'माँ तुझे सलाम' ही संगीतमय मैफल स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला छत्रपती संभाजीनगरकरांसाठी राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकता आणि देशभक्तीचा अविस्मरणीय अनुभव देणारा संस्मरणीय सोहळा ठरला.

## काव्यशास्त्र : कविता लिहिण्यापूर्वी (भाग – ३)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम् – bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३



♦ कवितेची भाषा कशी असावी?
शब्दार्थौ सहितौ काव्यम्।
– आचार्य मम्मट, काव्यप्रकाश
कवितेचा विचार करताना प्रथम मनात येणारा प्रश्न म्हणजे 'कवितेची भाषा कशी असावी?' अनेकांना वाटते की, कठीण शब्द वापरले, संस्कृतप्रचुर भाषा लिहिली किंवा दुर्मिळ शब्दांची रेलचेल केली म्हणजे कविता प्रभावी होते. प्रत्यक्षात तसे नसते. कवितेचे खरे सौंदर्य तिच्या भावानुरूप भाषेत असते.

♦ भाषा सोपी, पण सामान्य नसावी
कवितेची भाषा वाचकाला समजली पाहिजे; पण ती गद्यभाषेची केवळ प्रतिकृती असू नये. प्रत्येक शब्द योग्य ठिकाणी, योग्य अर्थछटा घेऊन यायला हवा. सामान्य शब्दही समर्थ कवीच्या हातात असामान्य होतात. ज्ञानेश्वर माउली, संत तुकाराम, बहिणाबाई चौधरी किंवा कुसुमाग्रज यांच्या कविता वाचताना हे प्रकर्षाने जाणवते. त्यांची भाषा अवघड नाही; परंतु तिच्यातील आशय, प्रतिमा आणि भावार्थ अत्यंत गहन आहे. म्हणूनच त्यांची कविता थेट हृदयाला स्पर्श करते.

♦ शब्दसंपत्तीचे महत्त्व : कवीकडे जितके समृद्ध शब्दभांडार असेल, तितक्या प्रभावीपणे तो आपल्या भावना व्यक्त करू शकतो. एकाच अर्थासाठी मराठीत अनेक शब्द उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, सूर्य या शब्दासाठी रवि, भास्कर, दिनकर, दिवाकर, आदित्य, मार्तंड, अर्क अशी अनेक नावे आहेत. प्रत्येक शब्दाची अर्थछटा आणि वापर वेगळा आहे. शब्दांचा हा सूक्ष्म भेद समजून घेतल्यास कवितेला वैविध्य प्राप्त होते. मात्र शब्दांचा वापर केवळ विद्वत्ता दाखविण्यासाठी नसून भाव अधिक परिणामकारक करण्यासाठी असावा.

♦ वाचनाशिवाय भाषा समृद्ध होत नाही.
भाषेवर प्रभुत्व मिळविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सातत्याने वाचन. विविध काळातील आणि विविध शैलीतील कवीता वाचल्याने शब्दांचे सौंदर्य, वाक्यरचना, प्रतिमानिर्मिती आणि लय यांचा नैसर्गिक परिचय होतो. मराठी संतसाहित्य, पंडितकाव्य, आधुनिक कविता, तसेच संस्कृतमधील कालिदास, भवभूती, भारवि, माघ यांसारख्या महाकवींच्या रचनांचे वाचन कवीची भाषाजाणीव समृद्ध करते. त्याचप्रमाणे उत्तम गद्यलेखनही वाचले पाहिजे. कारण प्रभावी कविता ही समृद्ध भाषेतूनच जन्म घेते.

♦ भाषेचे औचित्य : प्रत्येक विषयाला अनुरूप भाषा असते. भक्तिरसातील कविता आणि वीररसातील कविता यांची शब्दयोजना एकसारखी असू शकत नाही. निसर्गवर्णन, प्रेम, करुणा, राष्ट्रभक्ती किंवा अध्यात्म, प्रत्येक विषयानुसार शब्दांची निवड बदलत असते. कवीचे खरे कौशल्य याच औचित्यात दिसून येते. समर्थ रामदासांच्या ओजस्वी भाषेला आणि बहिणाबाईंच्या सहज, ग्रामीण भाषेला समान निकष लावता येणार नाही; कारण दोघांचे अनुभवविश्व आणि अभिव्यक्तीची शैली वेगळी आहे. तरीही दोघांचीही कविता परिणामकारक ठरते.

♦ निष्कर्ष : कवितेची भाषा ही कृत्रिम नसून भावाची नैसर्गिक अभिव्यक्ती असली पाहिजे. शब्दांचे वैभव, अर्थाची नेमकी निवड, लय, प्रसादगुण आणि औचित्य यांचा समन्वय झाला की भाषेला काव्यत्व प्राप्त होते. लक्षात ठेवावे. शब्द हे कवीचे साधन आहेत; परंतु भाव हा त्यांचा प्राण आहे.



# जिल्हा परिषद शाळेतील मुलांसाठी कै.केशव गंगाराम गावित स्कॉलरशिपची सुरुवात

ज्योतिर्मय साहित्य

नाशिक - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडपाडा सु. येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमांमध्ये प्रथम गावातून प्रभात फेरी काढून ध्वजारोहण इयत्ता दहावी मध्ये उत्तीर्ण झालेले कुमारी प्रिया यशवंत भोये हिच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहणानंतर विविध कार्यक्रम घेण्यात आले संगीत कवायत, मुलांची भाषणे, देशभक्तीपर गीते तदनंतर मिठाईची वाटप करण्यात आले तसेच माणूस म्हणून जन्माला आलो आहे तर समाजातील आपल्या माणसांसाठी आणि समाजाचे देणे या उद्देशातून नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच जिल्हा परिषद शाळांचे जतन करणे काळाची गरज आहे. हे ओळखून गावित परिवाराने वडिलांच्या नावाने कै.केशव गंगाराम गावित यांच्या स्मरणार्थ गावित परिवाराने सुरू केलेली शिष्यवृत्ती वितरण कुसुम केशव गावित, नारायण केशव गावित, यशवंत केशव गावित, दौलत चौधरी, परसराम गावित यांचे हस्ते करण्यात आले.

इयत्ता १ली कु. भावना अनंत नाठे ७०० रु., इयत्ता २ री कु.दिव्या नारायण गावित ८०० रु., इयत्ता ३ री कु. लक्ष्मी अनंता नाठे ९०० रु., इयत्ता ४ थी कु. कार्तिकी लक्ष्मण चौधरी १००० रु. व ज्येष्ठ नागरिक म्हणून चंदर चिमणा पवार यांना ११०० रुपये वाटप करण्यात आले. गावित परिवाराचा हा क्रांतिकारी निर्णय आदिवासी समाजाला तसेच विद्यार्थ्यांना भविष्यात नक्कीच मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरेल यात शंका नाही असे वक्तव्य उपस्थितांनी केले. यावेळी सर्व गावित परिवाराचे शाळा व्यवस्थापन समिती वडपाडा यांचे तर्फे आभार मानले. तसेच स्वदेश फाउंडेशन यांच्याकडून शालेय मुलांना मिठाई व डबे वाटप करण्यात आले. यावेळी गावातील सर्व ग्रामस्थ, स्वदेश फाउंडेशनचे पदाधिकारी आणि शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559